## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

### अपिल क्रमांक : के.आर- २१८३-अ/२०२२

**अपिलार्थी, श्री.संतोष कुमार तिवारी,**
सी ०४ न्यु मिरा पैराडाईज गिता नगर,
जुना पेट्रोल पंपच्या मागे, मिरा भाईंदर रोड,
मिरा रोड पूर्व, जि.ठाणे ४०१ १०७.

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, मिरा भाईंदर
महानगरपालिका, स्व.इंदिरा गांधी भवन, छत्रपती
शिवाजी महाराज मार्ग,भाईंदर (प.),ता.जि.ठाणे ४०११०१.

जन माहिती अधिकारी, विद्युत विभाग,
मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व.इंदिरा गांधी भवन,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,भाईंदर (प.),
ता.जि.ठाणे ४०१ १०१.

प्रथम अपिलीय प्राधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग,
मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व.इंदिरा गांधी भवन,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.),
ता.जि.ठाणे ४०१ १०१.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : ०७.०१.२०२६**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ०४.०५.२०२२ | २६.०५.२०२२ | ०७.०६.२०२२ | २४.०६.२०२२ |

अपिलार्थी यांनी दि. १९.०७.२०२२ रोजीच्या अर्जान्वये *"जन माहिती अधिकारी ,द्वारा सुचना का ना देना। प्रथम अपिलीय अधिकारी द्वारा सुनवाई में हमारा ना सुनना।* "असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक ०७.०१.२०२६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत).

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

"

1) *मिरा भायंदर महानगर पालिका मे वर्तमान समय मे कार्यरत "मेसर्स सलासर कंट्रक्शन" पत्र के संदर्भ मे "वसई विरार महानगरपालिका" द्वारा अनुभव प्रमाण के विषय मे मनपा को भेजे गये पत्रावली कि प्रत प्रदान करवाये।*
2) *"वसई विरार महानगरपालिका" के पत्रावली के बाद पद निर्देशित अधिकारी द्वारा अब तक कि गई समस्त कार्यवाही कि पत्र नोटींग सह प्रदान करवाये।"*

सदर प्रकरणी जन माहिती अधिकारी तथा प्रथम अपिलीय प्राधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांनी आयोगाकडे दि.०२.०१.२०२६ रोजीचे पत्र सादर केले आहे. सदर पत्रान्वये त्यांनी अशी विनंती केली आहे की, सद्यस्थितीत मिरा भाईंदर महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणुक जाहिर झालेली असल्याने, त्यांना सुनावणीस उपस्थित राहणे शक्य होणार नाही. तरी सुनावणीसाठी पुढील वेळ देण्यात यावी.

जन माहिती अधिकारी तथा प्रथम अपिलीय प्राधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका यांची विनंती मान्य करण्यात येत आहे. प्रकरण पुढील सुनावणीकरिता ठेवण्यात येत आहे. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.२५.०२.२०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यतायेईल.

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ०७ जानेवारी, २०२६.

राज्य माहिती आयोग,
कोंकण खंडपीठ